वसंत नगर तांड्यात पारंपरिक पद्धतीने होळी आणि रंगोत्सव जल्लोषात साजरा >> पान 2

सरकार खोक्या बोक्याच्या मागे >> पान 3

घोडाझरी तलावात बुडून पाच युवकांचा मृत्यू >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

सुविचार
मैत्री ही जीवनातील सर्वोत्तम भेट आहे, ती जपा..

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



कार्तिक आर्यन ११ वर्षांनी लहान अभिनेत्रीला करतोय डेट? आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 212 ■ रविवार, दि. 16 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# विदर्भात उष्णतेची लाट

## ३ जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट, मध्य महाराष्ट्रात विखुरलेले ढग

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्र सध्या चांगलाच तापलाय. विदर्भात बहुतांश ठिकाणी उष्णतेची लाट आहे. कमाल तापमानाचा पारा तिथे ४० ते ४१ अंशावर जाऊन पोहोचला आहे .नागरिकांना उन्हाचा तडाखा आणि अंगाची लाही लाही याचा एकत्रित अनुभव येतोय. विदर्भात बहुतांश ठिकाणी उष्णतेची लाट आहे. आज दिनांक १५ मार्च रोजी अकोला चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्याला उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट देण्यात आलाय. तर नागपूर वर्धा अमरावती जिल्ह्याला उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. अकोल्यात ४१.५ओल तापमानाची आज नोंद झाली. राज्यातील सर्वाधिक तापमान चंद्रपुरात ४१.८ अंश सेल्सिअस नोंदवले गेले.**

उत्तर महाराष्ट्रासह मध्य महाराष्ट्रही चांगला तापला आहे .हवामान विभागाच्या विशेष तापमान अहवालानुसार,कोकण मध्य महाराष्ट्र मराठवाडा आणि विदर्भ या सगळ्या विभागांमध्ये तापमान सामान्य होऊन अधिक नोंदवले गेले आहे. सोलापुरात सलग तिसऱ्या दिवशी तापमान ४०ओ वर होते . दरम्यान कर्नाटक राज्यात काही भागात तसेच दक्षिण मध्य महाराष्ट्राच्या लगतच्या जिल्ह्यात विखुरलेल्या ढगांचे प्रमाण दिसून आल्याचे के एस होसळेकर यांनी सांगितले . कोल्हापुरात वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्याचे सांगण्यात आले .तर विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट घेण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे .



आज कुठे किती तापमानाची नोंद झाली ?

चंद्रपूर - ४१.४ओउ, सोलापूर - ४१.१ओउ, वर्धा - ४१.०ओउ, अकोला - ४०.९ओउ, अमरावती - ४०.६ओउ, नागपूर - ४०.४ओउ, यवतमाळ - ४०.०ओउ, वाशीम - ३९.८ओउ, परभणी - ३९.८ओउ, जळगाव - ३९.५ओउ, गडचिरोली - ३९.४ओउ, सांगली - ३९.२ओउ, पुणे - ३८.७ओउ, छत्रपती संभाजीनगर - ३८.७ओउ, जालना - ३८.६ओउ, लातूर - ३७.८ओउ, बुलढाणा - ३७.६ओउ, गोंदिया - ३७.६ओउ, अहमदनगर - ३७.९ओउ, सातारा - ३७.९ओउ, नाशिक - ३६.३ओउ, पालघर - ३५.०ओउ, मुंबई उपनगर - ३४.५ओउ, मुंबई शहर - ३३.०ओउ.

पुढील पाच दिवस कसे राहणार तापमान?

पुढील ५ दिवसांत कोकण-गोवा भागात कमाल तापमान २-३ओउ ने घटण्याची शक्यता असून, किमान तापमानात मोठा बदल होणार नाही. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात कमाल तापमान स्थिर राहील, तर उत्तरी भागात किमान तापमान १-२ओउ ने कमी होण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात पुढील ३ दिवस तापमान स्थिर राहील आणि त्यानंतर किंचित घट होईल.

# शेतकरी आत्महत्याच्या बाबतीत महाराष्ट्र आघाडीवर

## शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या : आमदार विजय वडेट्टीवार यांची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शेतकरी आत्महत्येत महाराष्ट्र क्रमांक एक वर गेला आहे.शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याची आवश्यकता आहे. कर्जात शेतकरी बुडाला असून शेतमालाला भाव मिळत नाही. त्यामुळे कर्जमाफी मिळाली पाहिजे. वाटल्यास त्यासाठी कर्ज काढावे. मात्र, शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी, अशी मागणी आमदार विजय वडेट्टीवार यांनी केली.

माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, कोर्ट असं बोलायला लागला तर कसं होईल? उद्या एखाद्याने खून केला तर, त्याला शिक्षा देताना कोर्ट असेच तर्क मांडणार का? असा आमचा प्रश्न आहे. कुठलाही गुन्हेगार असेल आणि तो शिक्षेस पात्र असेल. तर, त्याला शिक्षा झाली पाहिजे. निवडणुकीचा खर्च वाढणार आहे, म्हणून आम्ही त्याला माफ करतो,न्यायालयाची अशी भूमिका हास्यास्पद आहे. न्यायालय असे वागणार असेल तर, न्यायाची अपेक्षा कोणाकडून करावी, असा प्रश्न त्यांनी केला. नाना पटोले यांनी काय ऑफर दिली हे मी माध्यमातून पाहिले.



राजकारणात कोणी कोणाचा मित्र नसतो, शत्रुही नसतो, वेळेप्रमाणे राजकारण चालते. त्यामुळे उद्या काय वाढून ठेवले आहे हे आता सांगता येत नाही. यांची आत्ताची ओढाताण पाहता पुढे काय होईल, हे सांगणं कठीण आहे. मात्र, नाना पटोले यांनी घाई केली एवढेच माझे म्हणणे आहे. बुलडाणा जिल्ह्यात युवा शेतकला पुरस्काराने सन्मानित करता आणि तो पाण्यासाठी आत्महत्या करतो. सरकारी कार्यालयात चकरा मारूनही त्याच्या शेताला पाणी आणि वीज देत नाही. मग त्या पुरस्काराचा काय अर्थ आहे.असा प्रश्न त्यांनी केला.

महाराष्ट्राच्या इतिहासात ही एक काळी नोंद आहे. बीडमध्ये ज्या न्यायाधीशाने पोलीस निरीक्षकाला सक्तीच्या रजेवर पाठवण्याचा निर्णय घेतला होता. तेच न्यायाधीश आणि पोलीस निरीक्षक एकत्रित होळी खेळताना दिसले. कायद्याचे रक्षण करणारे आणि कायदा सुव्यवस्था राखणारे यांची जोडी अशीच घट्ट जमली तर, कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे राज्यामध्ये निघतील. वाह न्यायपालिका व न्यायव्यवस्था, न्यायाधीश अशाच पद्धतीने आरोपींसोबत होळी खेळत असतील, तर, यांची तपासणी केली पाहिजे

हे प्रकरण बीडच्या बाहेरील न्यायालयात चालवले पाहिजे. कालचा धिंगाणा लज्जास्पद व कायद्यास व्यवस्थेला काळिमा फासणारी आहे. तर, नितेश राणे संधी साधू माणूस आहे. त्याला योगी व्हायचे आहे की, काय बनायचे आहे हे मला माहित नाही. मात्र, भाजपच्या काही प्रस्थापित नेत्यांसाठी नितेश राणेंचे असं बोलणं धोक्याची घंटा आहे. यांचे जुनी व्हिडिओ पहा हे आणि यांचे वडील स्वत: हलालचे मटन दाबून खाताना दिसतील. रमजानच्या कार्यक्रमांमध्ये मटन तोडताना दिसतील. राजापूरच्या घटनेबद्दल फारशी माहिती नाही मी माहिती घेत आहे. होळी आणि रमजान पवित्र सण आहे. यापूर्वी असे वातावरण कधीच होत नव्हते. जाणून बुजून एकमेकांशी झुंजवण्याचा सरकारचा मंत्री प्रयत्न करणार असेल तर असेच होईल,असे मत आमदार विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केले.

### अन् मेलेलं बाळ पुन्हा जिवंत झालं! धुळ्यात घडला 'असा' चमत्कार

**धुळे/प्रतिनिधी :** नंदुरबारमधील धडगाव तालुक्यात एक विलक्षण प्रकार घडल्याचे समोर आले आहे. होळीला माहेरी आलेल्या एका महिलेचे दोन महिन्यांचे बाळ उलट्या आणि अति रडण्याने निपचित पडले होते. बाळ काहीच हालचाल करत नसल्यामुळे घरच्या लोकांना बाळाचा मृत्यू झाल्याचे वाटल्याने महिलेच्या माहेरी आणि सासरी रडारड सुरू झाली. मात्र अशातच डॉक्टरांच्या रुपाने आलेल्या देवदूताने केलेल्या एका कृतीमुळे बाळ जिवंत झाले. या घटनेमुळे सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला असून हसरे वातावरण निर्माण झाले आहे. धडगाव तालुक्यातील तेलखेडी येथे राहणाऱ्या मिनाबाई सचिन पावरा ही महिला तिच्या दोन महिन्यांच्या बाळासह होळीसाठी आपल्या माहेरी गेली होती. माहेरी गेल्यावर बाळाची तब्येत बिघडली. उलट्या होऊन बेजार झालेले बाळ दूधही पीत नव्हते आणि बाळ निपचित पडले होते. त्याचबरोबर बाळाचा श्वासोच्छ्वासही बंद पडला होता. बाळ कुठलीही हालचाल करत नसल्यामुळे परिवाराकडून राडाराडा सुरू झाली आणि अंत्यविधीची ही तयारीला सुरुवात झाली होती. मात्र परिवारातील नातेवाईकांनी नजीकच्या आरोग्य केंद्रातील डॉक्टरांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच डॉक्टर घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर त्यांनी आपला अनुभव वापरत बाळाच्या पायाला टिचकी मारली आणि बाळ हालचाल करत श्वास घ्यायला लागले.




# शासनाच्या योजनांना प्रशासकीय उदासीनतेच्या वाकोड्या

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर : मेहकर - लोणार मतदार संघातील पाणीटंचाई चे समूळ उच्चाटन व्हावे, माय माऊली दारात मुबलक पाणी मिळावे. त्यांच्या डोक्यावरून पाण्याचा हंडा उतरून चेहऱ्यावर हास्य फुलावे, यासाठी शासनाने ठेवून मेहकर लोणार तालुक्यात तब्बल २३३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून पाणीटंचाईवर मात करण्यासाठी योजनांच्या माध्यमातून उपाययोजना करण्यात आली. मात्र, प्रशासकीय ने उदासीनतेने शासनाच्या या योजनांना वाकोडे लावून तिलांजली दिल्याने मेहकर लोणार तालुक्यातील एकूण २३३ कोटी रुपयांपैकी कोट्यावधी रूपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. जवळपास दीडशेच्या वर योजना या अर्धवटच राहिल्याने नागरिकांमध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात आहे.याबाबत नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांनी लक्ष घालून मनमानी करणाऱ्या प्रशासकीय यंत्रणेंना जाब विचारावा, अशी मागणी सर्व सामान्य जनतेकडून व्यक्त केली जात आहे.**

## ■ हर हर जल जल जीवन मिशन योजनेचे तीन तेरा
## ■ योजनेंचा कालावधी संपूनही योजना अर्धवटच.
## ■ गावागावात पाणी टंचाईचे चटके

मेहकर लोणार मतदार संघात जवळपास दीडशे योजनाच्या माध्यमातून पाणीटंचाईवर मात करण्यासाठी शासनाने तब्बल २३३ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. त्यामध्ये मेहकर तालुक्यात ९२ गावात जलजीवन मिशन योजनेचे काम करून या योजनेसाठी १३२ कोटी १५ लाख रुपयाचा निधी मंजूर केला होता.तर, लोणार तालुक्यातील ६८ गावातील योजनांसाठी तब्बल १०० कोटी ८५ लाख रुपये यांचा निधी मंजूर केला होता.

लोणार तालुक्यातील योजनांसाठी तब्बल १०० कोटी ८५ लाख रुपयाच्या मंजूर निधीतून कोट्यावधी निधी खर्च करण्यात आला आहे. विविध योजना अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या तब्बल १६० योजना ह्या अर्धवट आहेत. तर योजनांसाठी कोट्यावधी रुपये निधी खर्च झाल्यानंतरही पाणीटंचाई कायम असल्याने जनतेमध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात आहे.एकीकडे शासन पाणीटंचाई दूर करण्यासाठी व गोरगरीब जनतेला शुद्ध पाणीपुरवठा होण्यासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च करत असताना प्रशासकीय उदासीनतेमुळे मुळे मात्र, शासनाच्या या उदात्त हेतूने ठेंगा दाखविला जात असल्याचे चित्र संपूर्ण मतदारसंघात आहे. मेहकर लोणार मतदारसंघात इतर समस्या प्रमाणेच पाणीटंचाईच्या समस्यांचे गंभीर रूप धारण केले असून उन्हाळ्याच्या तोंडावर गावागावात पाण्यासाठी हाहाकार सुरू झाला आहे. महिलांच्या डोक्यावर हंडा असून रखरखत्या उन्हात महिलांना रानोमाळ भटकंती करण्याची वेळ आली आहे.त्याचबरोबर अनेक गावात टँकरने पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. शासन दरवर्षी पाणीटंचाईवर तात्पुरत्या उपाययोजना करून लाखोंचा निधी खर्च करतो. मात्र, कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी मंजूर केलेल्या निधीतून काम केले जात नसल्याने प्रशासकीय उदासीनता सर्वसामान्य जनतेचे बळी घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे तब्बल २३३ कोटी रुपयांच्या योजना अर्धवट असताना व या योजनांच्या कामाचा मुदत संपलेली असताना याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर वरिष्ठ अधिकारी पदाधिकारी यांनी गांभीर्याने दखल घेत त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी व शासकीय कामकाज पूर्ण करून घेण्याच्या सक्त सूचना निर्देश द्यावे, अशी मागणी जनतेकडून होत आहे.





देविदास खनपटे
मुख्य संपादक

### आमदार सिद्धार्थ खरात यांनी लक्ष देण्याची गरज

मेहकर लोणार मतदार संघात तब्बल २३३ कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे. तर, कोट्यावधी रुपये निधी या योजनांवरील खर्च करून योजना अर्धवट पडलेले आहेत. सदर योजनेचा काम करण्याचा कालावधी सुद्धा संपला असल्याची माहिती आहे. असून शासकीय योजना न राबवणाऱ्या संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांवर कारवाई करून सदर योजना पूर्ण करून घेण्यासाठी त्याचबरोबर गावा गावातील पाणीटंचाई दूर करण्यासाठी मेहकर लोणार मतदार संघाचे उच्च विद्याविभूषित व प्रशासकीय कामकाजाचा दीर्घ अनुभव असलेले आमदार सिद्धार्थ खरात यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन सदर प्रकरण विधानसभा सभागृहात उपस्थित करून काम न करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी पुढाकार घ्या व अर्धवट असलेल्या योजना पूर्ण करण्यासाठी शासकीय यंत्रणेतील कामचुकार अधिकाऱ्यांना सदर योजना पूर्ण करण्याच्या सूचना कराव्या, अशी मागणी मेहकर लोणार मतदार संघातील जनतेकडून केली जात आहे.

## गोरगरिबांचे जीव कवडीमोल

मागील आठवड्यात मुंबईतील नागपाडा येथे मोठी दुर्घटना घडली. पाण्याची टाकी साफ करण्यासाठी आत उतरलेल्या पाच मजुरांचा गुदमरून मृत्यू झाला. एका बांधकाम सुरू असलेल्या इमारतीत ही धक्कादायक दुर्घटना घडली. या दुर्घटनेत पाच मजुरांचा मृत्यू झाला तरीही त्याची दखल माध्यमांनी घेतली नाही. नाही म्हणायला प्रिंट मीडिया म्हणजे वर्तमान पत्रात या दुर्घटनेची बातमी छापून आली पण इलेक्ट्रॉनिक मीडिया म्हणजे न्युज चॅनलने या बातमीची दखलच घेतली नाही. एरव्ही कोणत्याही अदखलपात्र बातम्या ब्रेकिंग न्युज म्हणून दाखवणाऱ्या न्युज चॅनल वाल्यांना या बातमीची दखलही घेऊशी वाटली नाही हे विशेष. अर्थात पाण्याच्या टाकीत पडून गोरगरीब मजुरांचा मृत्यू झाल्याची ही पहिली दुर्घटना नाही या आधी अशा अनेक घटना घडल्या मात्र त्याची दखल घ्यावी असे कोणाला वाटले नाही. दोन वर्षापूर्वी पुणे जिल्ह्यातील कदमवाक वस्ती ग्रामपंचायतीच्या हद्दीत लोणी स्टेशन येथे एका इमारतीच्या शौचालयाची टाकी साफ करताना चार मजुरांचा गुदमरून मृत्यू झाला होता. अर्थात या दोन घटना वर्तमानपत्रात छापून आल्यामुळे त्या लोकांना समजल्या अशा अनेक घटना नेहमी घडत असतात. अनेकदा शौचालय साफ करताना, मोठमोठे सांडपाणी वाहक बंदिस्त नाले साफ करण्याकरिता उतरलेले सफाई कामगार आतील विषारी वायूच्या संपर्कात येऊन मरण पावल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. दुर्दैवाने यात अनेकांचा बळीही गेला आहे. नवी मुंबईत अशीच एक दुर्दैवी घटना घडली होती नवी मुंबईतील एरोली येथील शिवशंकर प्लाझा या इमारती बाहेर लेनस्कर्ट या चष्म्याच्या दुकानाबाहेर लावण्यात आलेला जाहिरातीचा फलक बदलण्यासाठी लावण्यात आलेली २५ फूट उंचीची चाकवाली शिडी सरकून वरच्या उच्च दाबाच्या वाहिनीला लागल्याने तिच्यात विद्युतप्रवाह उतरला या शिडीला एका ११ वर्षाच्या गरीब मुलाचा स्पर्श झाला त्यात त्या मुलाचे जळून निधन झाले. आताची नागपाडा येथील दुर्घटना तर त्याहून मोठी आहे त्यात पाच मजुरांचा जीव गेला तरीही त्याची दखल ना माध्यमांनी घेतली ना राजकीय नेत्यांनी ना समाजाने. आपल्या देशात गोरगरीब मजुरांचा जीव कवडीमोल आहे. हे गोरगरीब जगले काय नी मेले काय याचे कोणालाही काहीही सोयरसुतक नाही. अशा दुर्दैवी घटनेत अनेक मजुरांनी आपला जीव गमवला आहे. अनेक मजूर योग्य त्या सुरक्षेअभावी उंच बांधकामावरून पडून जीवाला मुकतात किंवा कायमचे अपंग होतात. काही मजूर पाण्याच्या, शौचालयाच्या टाकीत पडून मरतात. काही मजूर नाले सफाई करताना श्र्वास गुदमरून मरतात तर काही मजूर विजेच्या खांबावर चढून विजेचे काम करताना शॉक लागून मरतात. अशा प्रकारे अनैसर्गिक मृत्यू पावणाऱ्यांची संख्या शेकडोंच्या घरात असते पण त्याची दखल शासन, माध्यमे, समाज, पोलीस न्यायालय कोणीच घेत नाही कारण ते गरीब आहेत. सर्वसामान्य नागरिक आहेत तेच जर सुशांतसिंग राजपूत, पूजा चव्हाण यांच्यासारखे सेलिब्रिटी असते तर सर्व यंत्रणा खडबडून जाग्या झाल्या असत्या. माध्यमांनी २४ तास ब्रेकिंग न्युज चालवून टाहो फोडला असता. विरोधी पक्ष किंवा राजकीय नेतेमंडळींनी निदर्शने रास्ता रोको , धरणे आंदोलने केली असती. पण सर्व सामान्य गोरगरिबांच्या मृत्यूचे येथे कोणालाच काही देणेघेणे नाही, गरीबच होता त्याच्या मृत्यूची दखल घ्यायला तो काय सेलिब्रिटी होता का ? असाच विचार येथील यंत्रणा करत असतील म्हणूनच गोरगरिबांच्या निधनानंतर त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी कोणी पुढे येत नाही. गरीब म्हणून जन्माला येणे हा या देशात शाप आहे. सेलिब्रिटींना न्याय मिळवून देण्यासाठी येथील यंत्रणा जितक्या जागृत असतात तितक्याच त्या गोरगरिबांना न्याय मिळवून देताना उदासीन असतात. गोरगरिबांच्या जीवाला येथे मोल नाही. कवडीमोल असलेले जगले काय नी मेले काय कोणालाच काही फरक पडत नाही हेच वास्तव आहे. माणूस सामान्य असो गरीब असो की श्रीमंत असो प्रत्येकाचा जीव महत्वाचा असतो तथापि दुर्दैवी घटनांमध्ये गरिबांचे जीव हे बेदखल केले जातात, ही संतापाची बाब आहे. कोणत्याही निधनाच्या घटनेकडे सरकार बरोबरच समाजातील प्रत्येक घटकाने संवेदनशीलपणे पाहण्याची गरज आहे. आज बदलत्या समाज व्यवस्थेमध्ये संवेदनशीलता हरवत चालली आहे हे देखील सत्य आहे. समाजाने अधिक संवेदनशील राहिले पाहिजे.

# वसंत नगर तांड्यात पारंपरिक पद्धतीने होळी आणि रंगोत्सव जल्लोषात साजरा

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** वसंत नगर तांड्यात बंजारा समाजाने होळी आणि रंगपंचमी उत्साहात साजरी केली. सकाळी पारंपरिक पद्धतीने होळी दहनाचा विधी पार पडला, ज्यामध्ये महिलांनी सुगंधी पानाफुलांनी पूजा केली आणि वयोवृद्धांनी होळीच्या महत्त्वाचा संदेश दिला. गावातील उपवर तरुणांनी 'गेरियां' म्हणून धार्मिक विधी पूर्ण केले.

यंदाच्या होळीला पर्यावरणपूरकतेवर विशेष भर देण्यात आला, त्यामुळे कमी धूर निर्माण करणाऱ्या लाकडांचा वापर करण्यात आला. रंगपंचमीच्या आदल्या दिवशी 'फगाव' मागण्याची परंपरा जपत जमा झालेल्या निधीतून सामूहिक वनभोजनाचे आयोजन करण्यात आले.

सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये विशेष आकर्षण ठरला अजय राठोड यांचा डफडा वादनाचा कार्यक्रम, ज्याने उपस्थितांना पारंपरिक बंजारा संगीताचा आनंद दिला. दुसऱ्या दिवशी रंगपंचमीचा जल्लोष मोठ्या उत्साहात पार पडला, जिथे गुलालाची उधळण आणि स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी गावातील वयोवृद्धांनी तरुणांना संदेश दिला की, या परंपरा केवळ आनंदासाठी नसून, त्या आपली संस्कृती आणि एकता जपण्यासाठी आहेत. त्यामुळे हा उत्सव यापुढेही याच पारंपरिक उत्साहाने साजरा करावा आणि आपल्या संस्कृतीचे जतन करावे, असे आवाहन त्यांनी केले. संस्कृती, परंपरा आणि सामाजिक एकतेचा संगम साधत यंदाची होळी उत्साहात पार पडली.




# नादुरुस्त ट्रकला बसची जोरदार धडक; भीषण अपघातात कंडक्टरचा मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर शहरातून अपघाताची मोठी बातमी समोर आली आहे. यात नादुरुस्त ट्रकला बसने जोरदार धडक दिली असून या भीषण अपघातात कंडक्टरचा मृत्यू झालाय. तर ११ ते १२ प्रवासी जखमी झाले असल्याची माहिती समोर आली आहे. यातील जखमींपैकी ३ जणांची प्रकृती ही चिंताजनक असल्याचेही सांगितले जात आहे. नागपूर-चंद्रपूर महामार्गावरील पडोली येथील हायटेक फार्मसी कॉलेज समोर ही घटना घडली असून या अपघातामुळे सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे.


पुढे आलेल्या माहितीनुसार, ही बस नागपूरवरून चंद्रपूरकडे येत होती. दरम्यान, रात्री जवळपास साडेबारा वाजताच्या सुमारास हा अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की या अपघातात कंडक्टरचा मृत्यू झालाय. तर ११ ते १२ प्रवासी जखमी झाले असल्याची माहिती समोर आली आहे. संदीप वनकर असं मृत कंडक्टरचं नाव असून ते चंद्रपूर शहरातील नगीना भाग परिसरातील निवासी आहे. यातील सर्व जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तर या प्रकरणाचा अधिक तपास पडोली पोलीस करत आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठत पुढील कारवाई सुरू केली आहे. ड्रायव्हरने कुठलेही सुरक्षा नियम न पाळता नादुरुस्त ट्रक रस्त्याच्या बाजूला उभा केल्याची प्राथमिक माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

# डोंबिवलीसह कोकणातील गुंतवणूकदारांना शेअर गुंतवणुकीत लाखोंचा गंडा!



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण /प्रतिनिधी :** डोंबिवलीसह कोकणातील अनेक गुंतवणूकदारांना शेअर बाजारात २० टक्के परताव्याचे आमिष दाखवून लाखो रुपयांना गंडा घालण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. चिपळूण तालुक्यातील निवळी-कोंडवाडी गावातील एका व्यावसायिकाने हा गंडा घातल्याचा आरोप आहे. याप्रकरणी डोंबिवलीतील एका गुंतवणूकदाराने विष्णूनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे.



# कार्तिक आर्यन ११ वर्षांनी लहान अभिनेत्रीला करतोय डेट?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेता कार्तिक आर्यन सध्या त्याच्या डेटिंग लाइफमुळे चर्चेत आहे. यावेळी त्याच्या आईनेच मोठी हिंट दिली आहे. आयफा पुरस्कार सोहळ्यात त्याच्या आई माला तिवारी यांनी सूचक विधान केल्यानंतर चाहत्यांमध्ये चर्चा रंगली आहे की कार्तिक एका ११ वर्षांनी लहान प्रसिद्ध अभिनेत्रीला डेट करत आहे.

कार्तिक आर्यनच्या गर्लफ्रेंडबद्दल मोठी हिंट!

जयपूरमध्ये पार पडलेल्या आयफा पुरस्कार सोहळ्यात कार्तिक आर्यन सूत्रसंचालन करत होता. यावेळी प्रेक्षकांमध्ये त्याची आई माला तिवारी देखील उपस्थित होत्या. एका व्हायरल व्हिडीओमध्ये त्यांना कार्तिकच्या होणाऱ्या सुनेबाबत विचारण्यात आले. त्यावर त्या म्हणाल्या, आमच्या कुटुंबाची डिमांड एक चांगल्या डॉक्टरसाठी आहे.

या वक्तव्यावरूनच चाहत्यांनी अंदाज लावला की कार्तिक आर्यन अभिनेत्री श्रीलीला हिला डेट करत आहे. कारण श्रीलीला अभिनयासोबतच डॉक्टर होण्याचं शिक्षण घेत आहे. अद्याप कार्तिक किंवा श्रीलीलाकडून यावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. काही दिवसांपूर्वी कार्तिकच्या कुटुंबीयांच्या खास सेलिब्रेशनमध्ये श्रीलीला सहभागी झाली होती. हे सेलिब्रेशन त्याची बहीण आणि डॉक्टर कृतिका तिवारी हिने आयोजित केले होते. त्या व्हिडीओंमध्ये श्रीलीला कार्तिकच्या कुटुंबीयांसोबत धमाल करताना दिसली होती. त्यामुळे चाहत्यांनी या दोघांच्या रिलेशनशिपबाबत अधिक अंदाज बांधायला सुरुवात केली.

कार्तिक आणि श्रीलीला लवकरच एका चित्रपटात एकत्र झळकणार आहेत. हा चित्रपट दिवाळीच्या मुहूर्तावर प्रदर्शित होणार असून, त्याचे अधिकृत नाव अद्याप जाहीर झालेले नाही. श्रीलीला ही प्रसिद्ध दाक्षिणात्य अभिनेत्री असून, ती 'पुष्पा २' च्या आयटम साँगमध्ये देखील झळकली आहे. तिचे वय २३ वर्षे आहे आणि तिने आतापर्यंत अनेक दाक्षिणात्य सुपरस्टार्ससोबत काम केले आहे.

# कर्नाटकच्या तरुणांनी बिबट्याला पकडले जिवंत, लोणी – मणअंकलगी शिवारात घडला थरार

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर /प्रतिनिधी :** दक्षिण सोलापूर आणि कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील सीमावरती भागात महिन्याभरापासून दहशत निर्माण केलेल्या बिबट्याला जेर बंद करण्यात यश आलं आहे. कर्नाटकच्या विजापूर जिल्ह्यातील चडचण तालुक्यातील लोणी – मणअंकलगी शिवारात जीवाची परवा न करता तरुणांनी धाडसाने बिबट्याला जिवंत पकडल्याची चित्तथरारक घटना घडलीय. या बिबट्याला पकडण्यात सिंहाचा वाटा असलेल्या हलसंगीसह या दोन्ही गावच्या तरुणांच्या धाडसाचे कौतुक होत आहे. पकडलेल्या बिबट्याला विजयपूर वन विभागाने ताब्यात घेतले आहे.

विजापूर जिल्ह्यातील लोणी (बीके) येथील शेतात असलेले





कल्लाप्पा कोट्याळ यांच्यावर हल्ला करून बिबट्या पळून गेला. ही माहिती समजताच लोणी – मणअंकलगी येथील तरुणांनी बिबट्याचा शोध सुरू केला. मणअंकलगी येथील योग्यप्पा निलप्पा उटगी यांच्या द्राक्ष बागेत हा बिबट्या झोपलेल्या अवस्थेत ड्रोन दिसला. या बिबट्याला पकडण्यासाठी लोणी – मणअंकलगी येथील ग्रामस्थांनी विजयपूरच्या वन विभागाला कळवले. तसेच हलसंगी येथील वैदू समाजाच्या धाडसी तरुणांना बोलावले. संतोष बजरंगी यांच्या नेतृत्वाखाली आलेल्या बाबू बजरंगी, गुंडू हलसंगी, इराप्पा बजरंगी, मलकप्पा बजरंगी, पिंटू कळळी यांच्यासह वीस ते पंचवीस तरुण आले. त्यांनी बिबट्याला पकडण्यासाठी द्राक्ष बागेच्या एका बाजूस जाळे लावले.

यावेळी लोणी (बिके), मणअंकलगी, हलसंगी आणि गोट्याळ येथील २०० तरुण ग्रामस्थांनी या द्राक्ष बागेला वेढा घातला. हालसंगीच्या तरुणाने जिथे जाळी लावली होती. त्याच बाजूला बिबट्या पळत आला आणि जाळ्यात अडकला. तेव्हा धाडस दाखवत तरुणांनी जाळीत अडकलेल्या बिबट्याला काठी आणि हाताने दाबून जागचा हलू दिला नाही. दोरीने त्याचे पाय बांधले. बिबट्याला पकडण्याच्या या झपापटीत पाच ते सहा जण जखमी झाले. त्यामध्ये अर्जुन केसुगोळ, राजू म्हेत्रे आणि शिवराज पाटील हे लोणी येथील तिघे तसेच मणअंकलगी आणि गोट्याळ येथील दोघे जखमी झाले आहेत. दरम्यान विजयपूरहून वनविभागाच्या पथक घटनास्थळी आले. पकडलेल्या या बिबट्याला तरुणांनी उचलून वन विभागाच्या पिंजऱ्यात घातले. त्यानंतर वन विभागाचे अधिकारी या बिबट्याला विजयपूरला घेऊन गेले.

हलसंगी येथील वैदु (गोल्लार) समाजाच्या धाडसी तरुणांचे अनेकांनी कौतुक केले. या तरुणांमुळे लोणी (बिके), मणअंकलगी आणि गोट्याळ गावचे अनेकजण बिबट्याला पकडण्यास धाडसाने पुढे आले. युवकांनी असामान्य शौर्य दाखवून बिबट्याला जेरबंद केले. सध्या कर्नाटकातील समाज माध्यमावर बिबट्या पकडण्याचे व्हिडिओ व्हायरल झाले. त्यानंतर कर्नाटक- महाराष्ट्राच्या सीमावरती भागातील इंडी चडचण आणि दक्षिण सोलापूर तालुक्यात याची चचर्चा रंगली आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### शिंदेंना कॉंग्रेस पक्षात जायचं होतं या राऊतांच्या वक्तव्यावर कॉंग्रेस प्रवक्ते अतुल लोंढेंच्या प्रतिक्रिया



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** एकनाथ शिंदेंना काँग्रेस पक्षात जायचं होतं या ज्या चर्चा सुरु झाल्या आहेत. त्यांना काँग्रेसमध्ये यायचं होतं यातून राजकीय संकेत स्पष्ट आहे. भाजप या देशाला आर्थिक, सामाजिक एकात्मतेच्या दृष्टीने पुढे घेऊन जाऊ शकत नाही. त्यामुळे भविष्यात काँग्रेसच्या दारात रांगा लागते. अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांनी व्यक्त केली. त्यामुळे काँग्रेस शिवाय पर्याय नाही. अशी लोकांमध्ये जनमानसिकता तयार होत असताना इतर लोकांमधील चलबिचल वाढल्या आहेत.भाजप आपल्याला संपवत आहे. मात्र, काँग्रेस सोबत घेऊन चालतंय त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये काँग्रेसच्या दारामध्ये रांगा लागतील. अशी प्रतिक्रिया काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे यांनी दिली.

### औरंगजेबाची कबर हटवण्याची मागणी करणे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा जाज्वल्य इतिहास पुसण्याचा प्रकार आहे : हर्षवर्धन सपकाळ



दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** विश्र्व हिंदू परिषद व बजरंग दलाने स्टंटबाजी करून नये हर्षवर्धन सपकाळ यांची औरंगजेब कबर प्रकरणावर प्रतिक्रिया सिंधुदुर्ग : औरंगाबाद जेवढा क्रूर होता. तेवढ्याच क्रूर पडणे महाराष्ट्रातील फडणवीस सरकार वागत आहे. गृह विभाग हा घाशीराम कोतवाल प्रमाणे चालविला जातो की काय असा प्रश्र्न उपस्थित होतो. विश्र्व हिंदू परिषद व बजरंग दलाने औरंगजेब कबर हटवण्याची स्टंटबाजी करू नये, अशी प्रतिक्रिया काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

औरंगजेबाची कबर हटवण्याची मागणी करणे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा जाज्वल्य इतिहास पुसण्याचा प्रकार आहे. विश्र्व हिंदु परीषद आणि बजरंग दल यांनी स्टंट करू नये. औरंगजेब जेवढा क्रूर होता तेवढ्याच क्रूरपणे महाराष्ट्रातील फडणवीस सरकार वागत आहे. घाशीराम कोतवालप्रमाणे गृहविभाग चालतोय का असा प्रश्र्न पडतो. औरंगजेबाची कबर म्हणजे विरत्वाची कबर नाही. तर, ती कबर क्रूरपणाची आहे. त्यामुळे ती कबर शिवाजी महाराजांच्या जाज्वल्य इतिहासाची साक्ष देखील आहे. असे मत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन हर्षवर्धन सपकाळ यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

### राज्यात गुन्हेगारी वाढत आहे असा डेटा सांगतोय; सुप्रिया सुळे यांची सरकारवर टीका

**नाशिक/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्यात गुन्हेगारीचा आलेख वाढत आहे.असे डाटावरून दिसून येत आहे.मात्र, या सरकारला त्याचे काही देणे घेणे नाही हे सरकार सत्तेत धुंद झाले आहे.



अशी टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी बोलताना केली.तसेच नाशिकची घटना ही दुर्दैवी असल्याचे मत व्यक्त केले. माध्यमांशी बोलताना खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, दोन दिवसांपूर्वी उत्तम शेतकरी म्हणून कौतुक केले. त्या शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे.आज बीड जिल्ह्यात शिक्षकाने आत्महत्या केली.दोन्ही आत्महत्या दोन्ही बाबी अधिक चिंताजनक आहेत. महाराष्ट्र मुख्यमंत्री यांना विनंती करते की, एक सर्व पार्टी मीटिंग बोलवा. शेतकरी वर्ग पिकाच्या भावाची अधिक चिंताजनक आहे.ठिबक अनुदान अनेक वर्षापासुन रखडले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून केंद्रात काम करीत आहे. अनेक अर्थसंकल्प पाहितले आहेत. बाजारपेठ मध्ये मोठी उलाढाल होत आहे. बाजारपेठेतुन अनेक लोक पैसा काढत आहे. अर्थव्यवस्था धोक्यात आहे. निलंबित अधिकारी व्हिडिओ प्रकरण दुर्दैवी आहे.आरोपींना सजा ही झाली पाहिजे, अशी आमची पहिल्यापासून मागणी आहे. असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

# सरकार खोक्या बोक्याच्या मागे

## खासदार संजय राऊत यांचा आरोप

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** सरकार खोक्या बोक्याच्या मागे लागलंय शेतकऱ्यांचे प्रश्र्न कधी सोडवणार? असा प्रश्र्न खासदार संजय राऊत यांनी उपस्थित करून सरकारवर टिका केली. माध्यमांशी बोलताना खासदार संजय राऊत म्हणाले की, संतोष देशमुख प्रकरण,दमानिया हा विषय न्यायालयीन आहे.त्यासाठी सरकार आणि गृहमंत्री ते पाहत आहे. शेतकरी आत्महत्या होत असून हे सरकार ढोंगी आणि दुतोंडी आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्र्नावर,आत्महत्येवर तोंड उघडत नाही. बुलढाण्यातील कैलास नागरे या शेतकऱ्याला कृषी क्षेत्रातील पुरस्कार मिळाला होता. कृषी मंत्र्यांसह मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून त्यांनी आत्महत्या केली. केवळ कैलासची आत्महत्या नाही तर सर्व शेतकजयांची आहे. आता सदोष मनुष्यवधाचा गुन्हा कुणावर दाखल करावा याचा खुलासा मुख्यमंत्री यांनी करावा. सरकार काहीच करत नाही हे सरकार निक्कमे आहे. हे सरकार खोक्या बोक्याच्या मागे लागले आहे पण शेतकऱ्यांचे प्रश्र्न कधी सोडवणार? मुख्यमंत्री यांनी शेतकऱ्यांची माफी मागायला हवी, निवडणुकी पूर्वी मतासांठी दिलेली ती वचने होती. महिलांसाठी १५०० रूपयांचे दुकान लावले होते. कर्ज माफी ते नाही.

आता शिवभोजनपासून आनंदाच्या शिधापर्यंत सर्व योजना बंद कराता आहेत. सरकार मग कशासाठी चालवत आहे? काल घराघरात आक्रोश असताना रंग उधळत होते. एकमेकांना रंग फासत आहे. राज ठाकरे यांनी वक्तव्य लाडकी बहीणाला लाच दिलेली आहे.असे वक्तव्य केले. आम्हीही म्हटले होते की ती लाच आहे. हे करप्शन आहे. राज ठाकरेंनी मुख्यमंत्र्यांच्या दारात जावून आंदोलन करावे. ते भाजपसोबत आहेत. सर्वजण एकत्र आले पाहिजे. आम्ही आमची भूमिका मांडली. त्यांनी एकनाथ शिंदे, फडणवीस आणि अजित पवार यांना जाब विचारला पाहिजे, नाना पटोले वक्तव्याबाबत मी काय बोलू शकतो.

नाना पटोले हे आमचे सहकारी आहेत. राजकारणात काहीही अशक्य नसते. मविआ सरकार येईल असे कोणाला वाटले होते का? राजकारणाच सर्व शक्यता आहे. त्यांनी कुणाला ऑफर दिली आहे व कुणी मान्य केली आहे का हे त्यांच्याशी चर्चा करून बघू. राजकारणात रुसवे फुगवे आदळ आपट सुरू आहे. नानांनी लवकर भांडे वाजवले, थोडे थांबायला हवे होते.एकनाथ शिंदेंचा भगव्याशी काही संबंध नाही. भाजपच्या ताटाखालचे मांजर झाली आहे. त्यांच्या हाती भाजपचा झेंडा आहे. एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या हातात भाजपचा झेंडा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा भगवा झेंडा आहे.

भगव्या झेंड्याशी त्यांचा काही संबंध नाही. तो उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेचा आहे. एकनाथ शिंदे तेव्हा काँग्रेसकडे चालले होते. पृथ्वीराज चव्हाणांना विचारा. अहमद पटेल आता नाहीत. पण दिल्लीत त्यांच्याशी पहाटे चर्चा झाली होती त्यांची. हे सर्वात जास्त मला माहित आहे. जयंत पाटील मविआचे नेते आहेत. पवारांचे विश्र्वासु आहेत. काहीही अफवा पसरवू नका अन्यथा कायद्याने कारवाई होईल. नाना पटोले ऑफर बाबत बोलतायत. त्या ऑफरमध्ये मुनंगंटीवार आहेत का ते एकदाचे चेक करा, असेही यावेळी खासदार संजय राऊत म्हणाले.

## एमआयडीसी वाळूज परिसरातील ऑटो मोबाईल गॅरेजला भीषण आग

दैनिक आपला विदर्भ



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** एमआयडीसी वाळूज परिसरात प्लॉट नंबर १० गट नंबर २८ मध्ये स्थित असलेल्या बाळूमामा ऑटोमोबाईल गॅरेजला संध्याकाळी साडेसात वाजेच्या दरम्यान भीषण आग लागली. या आगीत ऑटोमोबाईल गॅरेज मध्ये दुरुस्तीसाठी आणलेल्या ग्राहकाच्या पाच ते सात मोटरसायकल उचलून भस्मसात झाल्यात तसेच गॅरेज दुकानाच्या आगीचा फटका शेजारील असलेल्या अभिषेक एंटरप्राइजेस, या कंपनीला बसल्याने कंपनीतील ऑफिस साहित्य याआधीच जळून भस्मसात झाले आगीची माहिती मिळतात एमआयडीसी वाळूज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामेश्वर गाडे अग्निशमन दलाचे अधिकारी वेळीच घटनास्थळी पोहोचून मोठ्या शर्तीच्या प्रयत्नाने अजिबात नियंत्रण मिळवले मात्र या लागलेल्या भीषण आगीत ऑटोमोबाईल गॅरेज मालकाचे मोठे आर्थिक नुकसान झाले



## समृद्धी महामार्गावर कारला लागली अचानक आग

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** समृद्धी महामार्गावर पालखेड गोळवाडी शिवारात भरधाव कारणे अचानक पेट घेतला.सुदैवाने यामध्ये कुठलीही जीवित हानी झाली नाहीये.या घटने बाबत मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार छत्रपती संभाजीनगर ला जात असलेल्या भरधाव कारला शनिवार रोजी सायंकाळी ७ वाजुन ४५ मिनिटांच्या सुमारास पालखेड गोळवाडी शिवारात अचानक आग लागली. आग लागल्याचे समजताच गाडीतील प्रवासी हे तात्काळ खाली उतरले. यामुळे सुदैवाने या घटनेत कुठलीही जीवित हानी झालेली नाहीये मात्र गाडी जळून खाक झाली आहे.

## दोन वर्षामध्ये वाळूची मागणी, पुरवठ्यामधील फरक दुर होईल

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा विश्वास



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** या आठवड्यामध्ये वाळू धोरण हे मंत्री मंडळासमोर जाईल आणि ज्या ठिकाणी लिलाव झाले नाही, आणि ज्या ठिकाणी इसीची परवानगी मिळाली आहे. त्याठिकाणी वाळू घाट लिलाव होतील घरकुलांना ५ ब्रास रेती देण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला आहे. जेवढी मागणी आहे. तेवढा वाळू पुरवठा होईल असं वाळू धोरण करत आहोत. दोन वर्षांमध्ये वाळूची मागणी आणि पुरवठा मधला फरक दूर होईल, दगड खाणी वरुन तयार केलेली वाळू, महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये वाळू क्रेशन प्रमोट करत आहोत. दोन वर्षामध्ये वाळूची मागणी आणि पुरवठा मधला फरक दुर होईल. असा विश्वास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.

माध्यमांशी बोलताना म्हणाले की, नागपूर जिल्ह्यात पाण्यासंदर्भात बैठक घेत आहोत, काल परवा ही बैठक झाली. शहराला पुरेसा पाणीपुरवठा होईल कुठे टँकरने पुरवण्याची परिस्थित येणार नाही, याची काळजी घेतली जाईल. कोटीचा आराखडा तयार करण्यात आला आहे आणि नागपूर शहरामध्ये २२ तारखेला शहराची बैठक घेणार आहे. यातून नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचा आराखडा तयार केलेला आहे.पाण्याची टंचाई येणार नाही याची काळजी घेणार आहे. या राज्यात विकासाचे अनेक प्रश्र्न आहेत. संजय राऊतांच्या बोलण्यावर महाराष्ट्राचे लक्ष नाही. माझं ही लक्ष नाही. जनतेला विकास पाहिजे, महाराष्ट्राच्या १४ कोटी जनतेला देवेंद्र फडणवीस सरकार कसं न्याय देईल जनतेला दिलेला संकल्प पुर्ण करता येईल यावर आमच लक्ष आहे. माणिकराव कोकाटे यांच्याबाबत कोर्टाने जी काही टिपण्णी केली असेल त्यावर मी वाचूनच बोलेन. बुलढाणा जिल्ह्यातील युवा शेतकरी आत्महत्या केली आहे. प्रत्येक भागात दरवर्षी वेगवेगळ्या भागात वेगेवगळी परिस्थिती असते. कमी पाऊस असतो कधी टंचाई असते. तिथे नक्की काय झालं याचा मी आढावा घेईन. असे मत माध्यमांशी बोलताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

# १८ व १९ रोजी दोन दिवसीय ग्रंथोत्सव; ग्रंथविक्री, प्रदर्शनी व विविध बहुरंगी कार्यक्रमाचे आयोजन


दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातर्फे दि. १८ आणि १९ मार्च २०२५ रोजी दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गर्दे वाचनालयाच्या सभागृहातील या ग्रंथोत्सवात वाचन संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार होण्यासाठी ग्रंथप्रदर्शन, ग्रंथविक्री, कविसंमेलन, व्याख्याने, तसेच विविध बहुरंगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरूवार, दि. १८ मार्च रोजी सकाळी ९.३० वाजता हुतात्मा स्मारकापासून गर्दे वाचनालयापर्यंत ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. साहित्यीक अर्चना देव यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे उद्घाटन होणार आहे. यावेळी नगर परिषदचे मुख्याधिकारी गणेश पांडे, शिक्षणाधिकारी अनिल आकाळ, गर्दे वाचनालयाचे अध्यक्ष गोकुल शर्मा उपस्थित राहतील.

सकाळी ११ वाजता उद्घाटन समारंभ केंद्रीय आरोग्य व कुटूंब कल्याण आणि आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी विशेष अतिथी केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्याचे मदत व पुनर्वसन तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद जाधव पाटील, कामगार मंत्री आकाश फुंडकर तसेच आमदार किरण सरनाईक, वसंत खंडेलवाल, धिरज लिंगाडे, चैनसुख संचेती, डॉ.संजय कुटे, संजय गायकवाड, श्र्वेता महाले, सिद्धार्थ खरात, मनोज कायंदे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलिस अधिक्षक विश्व पानसरे, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर आदी उपस्थित राहणार आहेत.

दुपारी २.३० ते ५ वाजेदरम्यान अभिजात मराठी भाषा आणि आपली जबाबदारी या विषयावर डॉ. एस. एम.कानडजे यांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यान होणार आहे. यामध्ये डॉ. गजानन जाधव, डॉ. कि.वा. वाघ, सुनिल वायाळ, नेमीनाथ सातपुते सहभागी होतील.




ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी दि. १९ मार्च रोजी सकाळी ११ वाजता कृत्रीम बुदधीमत्ता वाचन संस्कृतीवर होणारा परिणाम या विषयावर प्रा. कमलेश खिल्लारे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद. प्रमुख वक्ते डॉ.अरुण नन्हई, महेंद्र बोर्डे सहभागी होतील. दुपारी १.३० वाजता वाचन चळवळीमध्ये सार्वजनिक ग्रंथालयांचे योगदान या विषयावर डॉ.अनंत सिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. राजेंद्र गणगे, देविदास समुद्रवार, सुनिल झोरे, अनंत सातव, रामेश्र्वर गायकी, विष्णू इंगळे सहभागी होतील. दुपारी ३ वाजता डॉ. सुनिल पवार यांच्या अध्यक्षतेखाली कवि संमेलन. यामध्ये नितीन वरणकार, अरविंद शिंगाडे, राम सोनोने, सर्जेराव चव्हाण, कडुबा बनसोडे, धनंजय मऱ्हे सहभागी होतील.

दोन दिवशीय ग्रंथोत्सवाला जिल्ह्यातील ग्रंथालय कर्मचारी आणि पदाधिकारी तसेच नागरिकांनी कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी राजेश पाटील यांनी केले आहे.

# घोडाझरी तलावात बुडून पाच युवकांचा मृत्यू

## चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील घटना

दैनिक आपला विदर्भ






**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यात घोडाझरी तलावात बुडून पाच युवकांचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. हे युवक पोहायला गेले होते, अशी माहिती आहे. जनक गावंडे , यश गावंडे, अनिकेत गावंडे, तेजस गावंडे, तेजस ठाकरे अशी या युवकांची नावे असून ते चिमूर तालुक्यातील साठगाव कोलारीचे रहिवासी आहेत. पर्यटनासाठी ते इथे आले होते. यांच्यातील एक जण वाचला. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहचले. चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यात घोडाझरी पर्यटन स्थळ आहे. या ठिकाणी ब्रिटिश कालीन तलाव आहे. तलाव व पर्यटनस्थळ असल्यामुळे येथे बारमाही पर्यटकांची गर्दी असते. शनिवार आणि रविवारी तलावावर बाहेरून पर्यटक येतात.

# मी समाजातील सर्व नागरिकांना विनंती करतो की कोणत्याही अफवांना बळी पडू नका– प्यारे खान

दैनिक आपला विदर्भ



**नागपूर/प्रतिनिधी** :रत्नागिरीमध्ये होळीचा सण नेहमीच सद्भावना आणि बंधुत्वाच्या वातावरणात साजरा केला जातो. तिथे कधीही धार्मिक तणावाशी संबंधित घटना घडलेल्या नाहीत. मात्र, अलीकडेच एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे, जो अतिशय चिंताजनक आहे. काही समाजकंटकांनी समाजातील शांतता बिघडवण्याचा प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यक आयोगाचे अध्यक्ष म्हणून, मी रत्नागिरीचे एसपी धनंजय कुलकर्णी यांच्याशी या प्रकरणावर चर्चा केली आहे. पोलिसांच्या मते, परिसरात कोणताही तणाव नाही आणि परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे. त्यांनी आश्वासन दिले आहे की दोषींना माफ केले जाणार नाही. माझीही मागणी आहे की या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोरात कठोर कारवाई केली जावी आणि समाजात तेढ निर्माण करणाऱ्या लोकांना तुरुंगात टाकले जावे.

मी समाजातील सर्व नागरिकांना विनंती करतो की कोणत्याही अफवांना बळी पडू नका आणि कोणाच्याही भडकवण्याला बळी पडू नका. केंद्रात मोदीजींची सरकार आणि राज्यात फडणवीसजींची सरकार 'सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्र्वास' या तत्त्वावर काम करणारी आहे. जर कोणालाही दोषी आढळले, तर त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल.

पोलीस आणि प्रशासन आपले काम योग्य प्रकारे करत आहेत आणि सध्या परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे. माझी सर्व नागरिकांना विनंती आहे की रमजान आणि होळी हे बंधुत्वाचे सण आहेत, त्यामुळे आपण सर्वांनी एकत्र येऊन शांतता आणि राष्ट्रीय एकता कायम ठेवण्याची जबाबदारी पार पाडावी.

## धुळवडीच्या दिवशी साताऱ्यात तिघांचा मृत्यू, शेतमालकाच्या मुलासह मजूर विहिरीत बुडाला तर वणव्यात होरपळून शेतकऱ्याचा मृत्यू


**सातारा/प्रतिनिधी :** सातारा जिल्ह्यात धुळवडीच्या दिवशी दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये तिघांना मृत्यूनं गाठलं. पोहायला शिकताना शेत मालकाच्या एकुलत्या एक मुलासह शेत मजुराचा विहिरीत बुडून मृत्यू झाला. तर दुसऱ्या घटनेत डोंगराला लागलेल्या वणव्यात आंब्याची बाग वाचविताना तुकाराम सिताराम सावंत या वृद्धाचा होरपळून मृत्यू झाला.

कराड तालुक्यातील करवडी गावातील सह्याद्री कारखान्याचे माजी संचालक किशोर पाटील यांचा मुलगा राजवर्धन आणि शेतमजूर राजेंद्र कोळेकर हे शुक्रवारी (१४ मार्च) दुपारी विहिरीवरील मोटार बंद करण्यासाठी गेले होते. मोटर बंद केल्यानंतर दोघंही पोहण्यासाठी विहिरीत उतरले. काही वेळानं किशोर पाटील यांनी मुलगा राजवर्धन आणि राजेंद्र यांना अनेकदा फोन करूनही त्यांनी फोन न उचलल्यानं ते स्वत: शेताकडं आले. विहिरीच्या शेजारी दोघांचे कपडे, चपला आढळल्या. शंका आल्यानं त्यांनी ग्रामस्थांना बोलावून घेतलं.

विहिरीत जास्त पाणी असल्यानं दोघांचा शोध घेण्यासाठी कराडमधील मासेमारी करणाऱ्या तरूणांना बोलावण्यात आलं. त्यांनी विहिरीत उतरून राजवर्धन आणि राजेंद्र कोळेकर यांचे मृतदेह बाहेर काढले. घटनेची माहिती मिळताच कराड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप यांनी घटनास्थळी भेट दिली.

## विविध वृत्त...

### मंत्री माणिकराव कोकाटे यांना अपात्र करा, निवडणूकीसाठी लाडक्या बहिणी त्यांचा एक हप्ता द्यायला तयार – जयश्री शेळके



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांना भिकारी संबोधणाऱ्या कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती देत असताना न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की त्यांना अपात्र घोषित केले तर निवडणुका पुन्हा घ्यावे लागतील आणि तो खर्च राज्य शासनाला परवडणारा नाही हे या राज्याचे दुर्दैव आहे. न्यायालयाकडून जर असा निकाल येत असेल तर न्यायाची अपेक्षा जनता करणार तरी कोणाकडून या राज्य शासनाला निवडणुकीचा खर्च परवडणार नसेल तर या राज्यातील सगळ्या बहिणी आपल्या लाडक्या बहिणीचा योजनेचा एक हप्ता राज्य शासनाला द्यायला तयार आहे. पण निवडणूक पुन्हा होऊ द्या त्यांना अपात्र घोषित होऊ द्या आणि खरं काय ते लोकांसमोर येऊ द्या.

### राहत्या घरातून गांजाची विक्री करणाऱ्या आरोपीला पोलिसांनी घेतले ताब्यात




दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** रेकॉर्डवरील आरोपीच्या राहत्या घरातून गांजाची विक्री करणाऱ्या आरोपीला कळमना पोलिसांनी अटक करत एक किलो २५६ ग्रॅम गांजाची विक्री करणारा अटक करण्यात कळमना पोलिसांना यश आले. फैजान उर्फ नॉडी परवेज मन्सूर असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



आरोपी घरातून गांजाची विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी घराची झडती घेतली असता आरोपीच्या घरातून एक किलो २५६ ग्रॅम गांजा मिळून आला पोलिसांनी तात्काळ अटक केली.आरोपाच्या घरातून गांजा मिळून आला पोलिसांनी आरोपीला अटक केली हा रेकॉर्डवरील आरोपी असून त्याच्यावर आधीचे गुन्हे दाखल आहे.या बरोबरच पोलीस पुढील तपास सुरू आहे .हा आरोपी माल कुठून आणत होता. या मध्ये कोण सामिल आहेत याचा पोलीस तपास करत आहे.

### बालिकेवर अत्याचार प्रकरणी आरोपीस कारावास, खामगाव जिल्हा व सत्र न्यायालयाचा निकाल



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** चार वर्षीय बालिकेवर अत्याचार केल्याप्रकरणी खामगाव जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी धम्मपाल शेषराव गवई वय याला २० वर्षे सश्रम कारावास आणि २५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायमूर्ती पी. पी. कुलकर्णी यांनी हा निकाल दिला आहे.



ही घटना ३१ जुलै २०११ रोजी खामगाव शहरातील एका वस्तीत दुपारीच्या सुमारास घडली त्यावेळी मुलगी रडत होती. आईने तिला ताब्यात घेतले असता, पीडितेने घडलेली घटना सांगितली. त्यानंतर खामगाव शहर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला. या खटल्यात सरकार पक्षाने ९ साक्षीदारांची साक्ष नोंदवली. न्यायालयात गुन्हा सिद्ध झाल्याने न्यायमूर्ती पी. पी. कुलकर्णी यांनी आरोपीला २० वर्षे सश्रम कारावास आणि २५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे.सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी अभियोक्ता ड.रजनी बावस्कार यांनी युक्तिवाद केला.

# बंजारा समाजातील माता-भगिनींसोबत पारंपरिक पद्धतीने आमदार संजय गायकवाड यांनी साजरी केली होळी



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** होळी हा बंजारा समाज बांधवांच्या जीवनातला सर्वांत महत्त्वाचा सण. तसेच मुक्त आणि प्रसन्न वातावरणात होळी साजरी करण्यात येते. मानवी संस्कृतीची मूल्ये जपणारी ही होळी म्हणूनच बंजारा समाज बांधवांच्या जीवनात महत्त्वाची आहे. आज होळी सणाच्या निमित्ताने आमदार संजय गायकवाड यांच्या मातोश्री जनसंपर्क कार्यालय येथे बुलढाणा मतदार संघातील डोंगर खंडाळा तसेच इतर गावातील बंजारा समाजातील माता-भगिनींच्यावतीने आयोजित उत्सवात सहभागी होऊन बंजारा बांधवांना होळी सणाच्या शुभेच्छा आमदार संजय गायकवाड यांनी दिल्या आहेत. यावेळी बंजारा बांधवांनी माता-भगिनींनी पारंपारिक वादन व नृत्य सादर करून धर्मवीर आमदार संजय गायकवाड यांचे स्वागत केले.

# बुलढाण्यात बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्यावतीने महाबोधी महाविहार कायदा रद्द करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बौद्ध समाज बांधवांचे पवित्र स्थळ महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन बिहार येथे चालू आहे.

या मागणीला पाठींबा देण्यासाठी संबंध देश भरामध्ये धरणे आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनाच्या समर्थनात आज बुलढाणा येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या वतीने मलकापूर रोडवरील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाजवळून मोर्चा काढण्यात आला आहे. बौद्धगया येथील महाबोधि महाविहार १९४९ चा व्यवस्थापन कायदा रद्द करण्यात यावा. महाबोधी महाविहाराचे नियंत्रण संपूर्ण व्यवस्थापन हे बौद्धांच्या हाती देण्यात यावे. बुलढाणा जिल्ह्यातील भोन येथील प्राचीन बौद्ध स्तूपाचे जतन करून जागतिक संशोधन केंद्र व पर्यटन स्थळ करावे या मागणीसाठी मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी बौद्ध समाज बांधव उपस्थित राहून घोषणाबाजी केली आहे.

# आधी दारू पाजली अन् कोयत्याने गळा चिरून केली हत्या, अनैतिक संबंधातून तरुणाची निर्घृण हत्या

दैनिक आपला विदर्भ





**गोंदिया/प्रतिनिधी :** गोंदिया जिल्ह्याच्या आमगाव पोलीस स्टेशन हद्दीतील सावंगी-पदमपुर शेतशिवरात १३ मार्च रोजी सकाळच्या सुमारास अर्धवट गळा कापलेल्या अवस्थेमध्ये मृतदेह आढळलेला होता.

याप्रकरणी आमगाव पोलिसांनी एका आरोपीला अटक केली असून ही हत्या अनैतिक संबंधातून झाल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. श्रवण सोनवणे (२५) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. मृतक नरेश चौधरी व आरोपी श्रवण सोनवणे हे दोघेही एकाच गावातील रहिवासी असून रात्रीच्या सुमारास दोघेही आमगावला गेले. तिथून दोघांनीही दारू घेऊन पदमपूर शेतशिवारामध्ये जेवण करण्याचा बेत आखला. दोघांनी मद्यप्राशन केले त्यानंतर आरोपी श्रवण याने नरेश बेसावध असताना मागून त्याच्या गळ्यावर धारधार कोयत्याने वार केले. यातच नरेश याचा मृत्यू झाला. काल सकाळी नरेशचा मृतदेह आढळल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्र फिरवत आरोपी श्रवण सोनवणे याला अटक केली आहे. अनैतिक संबंधातून ही हत्या झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. घटनेचा पुढील तपास आमगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मडामे व पोलीस निरीक्षक तिरुपती राणे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.